**प्रेसनोट दिनांक ०४/०८/२०१९**

**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर**

**विमानतळ पोलीसांनी अवैध धंदयावर छापा टाकुन २ इसमांना अटक करुन रूपये ३००/- ची ५ लिटर गावठी तयार दारु प्लॅस्टींक कॅन्डसह जप्त..**

दिनांक ०१/०८/२०१९ रोजी पोलीस उप निरीक्षक श्री झांजुर्णे,पोलीस नाईक ४९७ पारडे,पोशि ८२७३ निलख, पोशि.१०४९८ विधाते असे मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक साो विमानतळ पोलीस स्टेशन पुणे यांचे आदेशान्वये अवैध धंदयावर कायदेशीर कारवाई करणेसाठी चौकीचे हददीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना पोलीस उप निरीक्षक श्री झांजुर्णे यांना त्यांचे बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, हनुमान मंदीराचे मागे बर्मासेल इंदीरानगर येथील मोकळया जागेत एक इसम बेकादेशिरपणे दारु विक्री करीत आहे. अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने त्यांनी २ इसमांना पंच म्हणुन बोलावुन घेवुन त्यांना बातमीचा आशय समजावुन सांगुन सदरचे पंचा समवेत पोलीस उप निरीक्षक श्री झाजुर्णे व वरील नमुद कर्मचारी यांनी १७/०५ वाजता छापा टाकुन इसम नामे रामु हनुमंत राठोड वय ३७ वर्षे रा. बर्मासेल इंदीरानगर लोहगांव पुणे यास त्याचेकडील कि. रुपये ३००/- ची ५ लिटर गावठी तयार दारु प्लॅस्टींक कॅन्डसह ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच  गणेश पारडे पोलीस नाईक ४९७ विमानतळ पोलीस स्टेशन पुणे यांनी त्याचे विरुध्द महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ॲक्ट कलम ६५(ई) प्रमाणे फिर्याद दिल्याने विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि नंबर २९६/२०१९ महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ॲक्ट कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन पोलीस उप निरीक्षक श्री झांजुर्णे यांनी आरोपी नामे  रामु हनुमंत राठोड वय ३७ वर्षे रा. बर्मासेल इंदीरानगर लोहगांव पुणे यास दिनांक १/०८/२०१९ रोजी २०/०० वाजता अटक केलेली आहे. दाखल गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक श्री झांजुर्णे हे करीत आहेत.

**(राजेंद्र पाटील)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे**